सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र.२२३/२०२६

सर्व नियमित वेतनश्रेणीत व कायमस्वरुपी कार्यरत असलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना क्रीडा स्पर्धा किंवा इतर स्पर्धामध्ये भाग घ्यावयाचा असल्यास त्याबाबत विद्यापीठ संकेतस्थळावर परिपत्रक क्र.३१८/२०१९ जा.क्र.एएन/४८५०, दिनांक १६/१२/२०१९ प्रसिध्द करण्यात आलेले आहे. परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ०३ नुसार क्रीडा प्रकारानुसार वर्षातून एकदाच संघाची निवड केली जाईल व निवड केलेल्या दिनांकापासून पुढील एक वर्ष कालावधीकरिता सदर संघ कायम राहील असे कळविण्यात आलेले आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, क्रिकेट स्पर्धेमध्ये ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सहभागी व्हावयाचे असेल, त्यांनी आपल्या विभागप्रमुखांमार्फत उपकुलसचिव, प्रशासन शिक्षकेतर कक्ष यांचेकडे दिनांक १५/१०/२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत. प्राप्त झालेल्या अर्जातून विद्यापीठ संघाची निवड दिनांक १६/१०/२०२६ रोजी सकाळी ०८.०० वाजता 'बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय मैदान, गोखले रोड, पुणे' या मैदानात करण्यात येणार आहे व सदर संघ दिनांक १५/१०/२०२७ पर्यंत कायम राहील.

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.
जावक क्र.एएन/ 3840
दिनांक : 13 OCT 2026

(प्रा.(डॉ.) प्रफुल्ल पवार)
प्रभारी कुलसचिव

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

सदर परिपत्रक संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावे ही विनंती

E:\Admin Data\2025\CRICKET\Cricket Circular.docx

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

FIT INDIA

क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११००७ (भारत)
Board of Sports & Physical Education Near. IUCAA, Ganeshkhind, Pune – 411007 (INDIA)
e-mail: directorsports@unipune.ac.in

दिनांक: ०१/१०/२०२६

प्रति,

मा. कुलसचिव
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे – ७.

विषय: विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी क्रिकेट संघाच्या निवड–चाचणीत सहभागी होण्याबाबत...

महोदय,

प्रशासन शिक्षकेतर कक्षामार्फत प्रसिद्ध परिपत्रकास अनुसरून मी, उपरोक्त निवड चाचणी प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छित आहे. माझी वैयक्तिक माहिती पुढीलप्रमाणे.

अ. क्र.	तपशील	
१	पूर्ण नाव	
२	धारण करीत असलेले पद	
३	विभागाचे नाव	
४	जन्मतारीख	
५	वजन	
६	उंची (सेमी.)	
७	सपंर्क क्रमांक	

या क्रीडाप्रकारात माझा सहभाग मी खालील जागी करू इच्छितो (योग्य पर्यायाखाली टिक करा)

बॅट्समन	बॉलर	विकेट किपर	ऑल राऊंडर

क्रिकेट या क्रीडा प्रकाराची मला पूर्ण माहिती असून मी, स्वेच्छेने या निवड चाचणी सहभागी होत आहे. या खेळादरम्यान होणा–या संभाव्य दुखापतींची मला कल्पना आहे. या निवड चाचणीत सहभागी होताना मी, शारीरकि व वैद्यकियदृष्टया पूर्णपणे तंदुरूस्त असून खेळासाठी आवश्यक क्रीडा साहित्य तसेच संरक्षक गोष्टी जसे की, बॅट, विविध संरक्षक पॅड, हेल्मेट, गार्ड इ. चा वापर मी आवश्यकतेनुसार करण्याचे मला ज्ञान आहे. निवड समिती सदस्यांना आवश्यकता वाटल्यास मी, वैद्यकिय तंदुरूस्तीचे प्रमाणपत्र सादर करेन.

कर्मचा–याची स्वाक्षरी